शोध पत्र- राजनीतिक विज्ञान

Dec.-09—Jan.-2010

# बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाची मांडणी

* डॉ. विजय पाटील **डॉ. दिलीप पवार

*व्याख्याता, श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय सांगली ( महाराष्ट्र )
** प्राचार्य, भगवान बाबा महाविद्यालय आष्टी, जिला बीड ( महाराष्ट्र )

मानवी इतिहासातील परिवर्तनांचा वेध घेऊन ऐतिहासिक विकासाचा एकसंघ सिध्दांत कार्ल मार्क्सने मांडला. इतिहासाचे भौतिकवादी निरुपण The materialist interpretation of History किंवा ऐतिहासिक भौतिकवाद या नावाने हा सिध्दांत ओळखला जातो.[1] मार्क्सच्या द्वंदात्मक भौतिकवादाच्या Dialectical Materalism दार्शनिक दृष्टीकोनानुसार विशिष्ट मानव समाजाचा इतिहास समजून घेण्यासाठी ऐतिहासिक भौतिकवाद या अन्वेशण पध्दतीचा (Methodology) अवलंब केला जातो. या अन्वेशण पध्दतीला वर्गीय दृष्टीकोण असेही म्हणतात. वर्गपूर्व समाजाच्या अंतापासूनचा मानव इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे.

कार्ल मार्क्स, फ्रेडरिक एंगल्स आणि लुईस मॉर्गन यांच्या सैध्दांतिक मांडणीतून तयार झालेले हे ऐतिहासिक भौतिकवादाचे प्रारुप (Model) केवळ वर्ग (Class) ही षोशण संस्था (Category) गृहीत धरुन इतिहासाचे विष्लेशण करणारे आहे. या प्रारुपानसार कोणत्याही देषातील मानवसमाजाचा विकासक्रम एकप्रवाही (Unilinear) असतो. म्हणजे प्राथमिक वर्गविहिन साम्यवादी गणसमाज (Primitive Classless Communist Society) , नंतर गुलामगिरीप्रथाक वर्गसमाज (Slavery Class Society), त्यानंतर सामंप्रथाक वर्गसमाज Feudal Class Society), अंतीमत: भांडवलदारी वर्गसमाज (Capitalist Class Society) आणि समाजवादी समाज (Socialist Society) अषा विकासक्रमातून (Periodilisation) सर्व समाज संक्रमण करतात. अशाप्रकारे एंगल्स व मॉर्गन यांच्या एकप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाने व्यवस्थेच्या 'उदय विकास अंत' पध्दतीचे वर्गीय प्रारुप प्रचलित केले. ही एकप्रवाही अन्वेषणपध्दत वर्गसमाजांना अजूनही लागू आहे. त्याआधारे रशिया, पूर्व युरोपीय राष्ट्रे, चीन, उत्तर कोरीया, व्हिएतनाम, परंतु ज्या देषामध्ये जात (Caste) वंष (race) आणि गण (Tribes) यासारख्या वर्गापेक्षा भिन्न अषा षोशणसंस्था (Category) अस्तित्वात आहेत तेथे मात्र उपरोक्त एकप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादी अन्वेशणपध्दतीला मर्यादा येते. आफ्रिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रामध्ये पायाभूत षोशणसंस्था अजूनही टोळयाच (Tribes) आहे. अषा टोळीसमाजाचे आकलन एकप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाच्या अन्वेशण पध्दतीने होईना म्हणून अमेरिकन व युरोपियन मार्क्सवाद्यांनी बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादी अन्वेशणपध्दतीचा अवलंब केला. त्यामुळे ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारे समाजविकासक्रमाचे विश्लेषण करणा—या मार्क्सवादी संशोधकामध्ये एकप्रवाही आणि बहुप्रवाही अन्वेषणपध्दतीचे दोन प्रवाह निर्माण झाले. जे मार्क्सवादी पंडीत प्राग्मानवषास्त्र (Anthropology) मॉर्गन आणि एंगल्स यांना प्रमाण मानतात ते एकप्रवाही पध्दतीचे पुरस्कृर्ते म्हटले जातात. तर जे मार्क्सोक्त आषियन उत्पादन पध्दतीला प्रमाण मानतात ते स्वत:ला बहुप्रवाही अन्वेशण पध्दतीचे पुरस्कर्ते म्हणवतात. अन्वेषण पध्दतीतील ही दुफळी मार्क्सवादाच्या मुळ ऐतिहासिक भौतिकवादी अन्वेशण पध्दतीतील अरिष्टातून उद्‌भवली आहे[2]

या कालखंडात वर्ण आणि जाती या षोशण शासन करणा—या संस्था होत्या. या संपूर्ण काळात वर्गसंस्था अस्तित्वात नव्हती. वर्गव्यवस्था ही ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतात प्रथमच उदयास आली. वासाहतिक भारतीय समाजात प्रथमच वर्गसंबंध (Class relation) निर्माण झाले.[3] तेंव्हा वासाहतिक समाजापासून भारतात जातीव्यवस्था व वर्गव्यवस्था जोडीने नांदत आलेल्या आहेत. जगभराप्रमाणेच भारतात निसर्ग अवस्थेतील मानवी टोळया या स्त्रीसत्ताक गण समाजात रुपांतरीत (Gynacracy) झाल्या. परंतु इतर देषात हा स्त्रीसत्ताक गणसमाज पुरुषसत्ताक गणसमाज (Patriarchy)

बनला. तर भारतात मातृवंशक गणसमाज (Matriarchy) बनला. जर पुरुषसत्ताक गणसमाज अतिरिक्त उत्पादनक्षम (खाजगी मालमत्तेचा उदय) झाला. तर तो गुलामगिरीप्रथाक वर्गसमाजात (Slavery) संक्रमण करतो. याउलट तो भारताप्रमाणे मातृवंशक गणसमाज बनला आणि अतिरिक्त उत्पादनक्षम झाला तर तो दासप्रथाक वर्णसमाजात संक्रमण करतो. युरोपात स्त्रीसत्ताक प्राथमिक गणसमाज पुरुषसत्ताक गणसमाजात रुपांतरीत झाला. त्यानंतर अतिरिक्त उत्पादनक्षम होताच, त्याचे विघटन होऊन वर्गीयस्तरीकरणातून (Stratification) तो दासप्रथाक वर्गसमाज बनला. भारतामध्ये स्त्रीसत्ताक गणसमाज हा मातष्वंशक समाजात रुपांतरीत झाला. मातृवंशक गणसमाजातील गणराज्यांनी मागासलेल्या गणांना जिंकून गुलाम बनविले. त्यातून दासप्रथाक वर्णसमाज बनला. वर्णसमाजात खाजगी मालमत्ता, कुटुंबसंस्था व सैन्यदला ऐवजी गणमालमत्ता, कुलसंस्था आणि राजपुरुषदल व गणसैन्य होते. युरोपात गुलामगिरीच्या वर्गसमाजानंतर मालक आणि गुलाम हे वर्गसंबंध लय पावून सामंत जमीनदार आणि भूदास हे वर्ग असणारी सरंजामशाही निर्माण झाली. भारतात मात्र दासप्रथाक वर्णसमाज हा जातीव्यवस्थाक सरंजामषाहीत रुपांतरीत झाला. युरोपीय सरंजामषाही समाजात जमिनीची मालकी सरंजामदारवर्गाकडे होती, तर षेतकरी हा सरंजामदाराच्या जमिनीवर भूदास वा कुळे म्हणून राबत असे. भारतीय सरंजामषाहीमध्ये सरंजाम जाती या केवळ आपापल्या वतन जमिनीच्या मालक असत, तर षेतकरी आपापल्या जमिनीचे मालक असत. म्हणून 'वर्ग' ही संस्था उत्पादन साधनांच्या मालकी—अमालकीवर आधारलेली असते. तर जात ही संस्था उत्पादन साधनाच्या मालकी अमालकीवर आधारलेली नसते [4]

पारंपरिक मार्क्सवादी मात्र वर्ण—जाती या वर्गाषिवाय स्वतंत्र षोशणसंस्था मानण्यास तयार नाही. त्यांच्या मतानुसार वर्ण—जाती या वर्गाचीच रुपे आहेत.[5] याउलट कॉ. पाटील हे वर्ण—जाती या वर्गापेक्षा भिन्न असल्याचे ठासून सांगातात ते पुढील कोष्टकावरुन लक्षात येते. भारतीय दासप्रथाक वर्णव्यवस्थेत आणि सरंजामी जातीव्यवस्थेत वर्गव्यवस्था नव्हती म्हणून या कालखंडात झालेले संघर्श वर्गसंघर्श नव्हते. त्यामुळे 'जगाचा लिखित इतिहास हा वर्गसंघर्शाचा आहे.'[6] हा मार्क्सवादी सिध्दांत येथे बाधीत होतो. कारण उपरोक्त कालखंडात शोषक शासक वर्ण किंवा जाती (जमाती) आणि शेषित—शासीत वर्ण किंवा जाती (जमाती) यांच्यात होणारे संघर्ष वर्णलढयांच्या किंवा जातीलढयाच्या स्वरुपात होत असत, वर्गलढयाच्या स्वरुपात नाही.

| अ.क्र. | जात | वर्ग |
|---|---|---|
| 1. | जात जन्मसिध्द असते | वर्ग जन्मसिध्द नसतो |
| 2. | व्यवसाय जन्मसिध्द असतो | व्यवसाय जन्मसिध्द नसतो |
| 3. | बेटीव्यवहार जाती बाहेर नाही | बेटीव्यवहार वर्गाबाहेर होतो |
| 4. | रोटीव्यवहार जाती बाहेर नाही | रोटीव्यवहार वर्गाबाहेर होतो |
| 5. | अलग बहिष्कृत वस्त्या असतात | अलग बहिष्कृत वस्त्या नसतात |
| 6. | जातींचे नियमन—दंडन जातपंचायत करते | वर्गपंचायती नसतात. |

निखळ वर्गवादामुळे मार्क्सवादी ऐतिहासिक भौतिकवादाला जरी मर्यादा निर्माण झाली असली तरी या सिध्दांताचे रुप (Form) कालबाहय झालेले नाही. कोणत्याही समाजाच्या 'उत्पत्ती स्थिती आणि लय' यांचे नियम शोधून काढणारी ही एकमेव अन्वेषणपध्दती (Methodology) आहे. कोणत्याही समाजाच्या भौतिक पायपासून (Sub Structure) उत्पादन षक्ती व उत्पादन संबंधापासून सुरु करुन मग तो इमल्याकडे (Super Structure) गेला पाहिजे आणि मग या एकूण अभ्यासाच्या अमुर्तीकरणातून (Abstraction) त्या समाजाचे उगम अंताचे नियम शोधून काढले पाहिजे, असे या सिध्दांताचा गाभा (Core) सांगतो.[7] म्हणून कोणत्याही समाजव्यवस्थेचा इतिहासक्रम समजावून घेताना त्या समाजातील उत्पादनशकती—उत्पादनसंबंध प्रथम समजवून घेतले पाहिजे. या उत्पादन संबंधानी समाजाचा पाया (Base) बनत असतो आणि त्यावरच त्या समाजाची सामाजिक, राजकीय, धार्मिक, दार्षनिक, सांस्कृतिक, ईमारत (Super Structure) उभी असते[8] तेव्हा भारतीय इतिहास समजावून घेताना पारंपारिक मार्क्सवादी पध्दतीने एकप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाचे वर्गीय प्रारुप न वापरता कॉ. षरद पाटील प्रणीत बहुप्रवाही ऐतिहासिक भौतिकवादाचे अन्वेषण पध्दती वापरली पाहिजे.

## सन्दर्भ ग्रन्थ

1 पाध्ये प्रभाकर,—मानव व मार्क्स श्री. विद्या प्रकाशन, पुणे 1980 पृ. 113 2 पाटील शरद—मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद सुगावा प्रकाशन, पुणे 1993 पष्ृ 180 3 पाटील षरद—जातीय संघर्श आणि कम्युनिस्ट चळवळ, तात्पर्य दिवाळी अंक 1978 प. 180 4.पाटील शरद—जातीव्यवस्था विरोधी लढयाची सम्यक दषा, सत्यषोधक मार्क्सवादी जून 1982 पष्ृ 20 5. श्रमिक मित्र—पुन्हा एकदा वर्ग जाती संघर्षवादकृ. तात्पर्य, जून 1981 पष्ृ 27 6 मार्क्स कार्ल—एंगल्स फ्रेडरिक— मेनिफेस्टो ऑफ द कम्युनिस्ट, सिलेक्टेड वर्क्स, व्हॉल्युम—1 प्रोग्रेस पब्लिषर्स, मॉस्को 1973 पष्ृ 108 7 पाटील षरद—पुर्वोक्त 2, पृ. 179, 180 8.म ार्क्स कार्ल—फ्रॉम द इन्स्ट्रॉडक्षन टू क्रिटीक ऑफ पोलिटीकल इकॉनॉमी कॅपिटल ॲन्ड अदर रायटींग्ज बाय कार्ल मार्क्स, द मॉडर्न लायब्ररी, न्यूयॉर्क, 1932 पष्ृ 10, 11